Google ला सर्च करा

गुरुमाऊली

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

## इयत्ता – चौथी ( 18 ऑगस्ट ) विषय – मराठी

Subscribe

खालील बटणांना क्लिक करून ऑनलाईन टेस्ट सोडवू शकता.

मराठी टेस्ट

गणित टेस्ट



इंग्रजी टेस्ट

सेमी गणित टेस्ट

प.अभ्यास-1 टेस्ट

प.अभ्यास-2 टेस्ट

वाचा व समजून घ्या.

## ८. गुणग्राहक राजा

टेस्ट सोडवा



तिशी ओलांडलेले सयाजीराव गायकवाड फेरफटक्यास निघाले. बरोबर मानकरी नारायणराव घाटगे होते. एवढ्यात मुलांचा हसण्या–खिदळण्याचा आवाज ऐकू आला. महाराजांनी घोडा थांबवला. आवाजाच्या दिशेनं पाहिलं. तिथे एक वडाचं झाड होतं. एक पोरगा माकडासारखा उड्या मारत खोडावर चढला. दुसरा पोरगा त्याचा पाठलाग करत होता. पहिल्यानं पारंबी पकडली. माकडासारखा झोका घेतला. घोड्यावर बसल्यासारखा फांदीवर बसला. दोघा पोरांचा सुरपारंबीचा खेळ सुरू झाला. सयाजीराव महाराज देहभान विसरून खेळ बघू लागले. मनानं त्यांच्या बालपणातील 'मौजे कवळाणे' गावी आले. तेथील मारुती मंदिराजवळील वडाच्या झाडावर चढले. पोरांसोबत सुरपारंबी खेळ खेळू लागले.

थोड्या वेळानं महाराज भानावर आले. स्वतःशी हसले. निघताना मानकऱ्यांस म्हणाले, "पोरं चपळ आहेत. कोणाची पोरं आहेत ही ? विद्याधिकाऱ्यांना सांगून त्यांना राजवाड्यात बोलवा."

सयाजीराव गायकवाड राजवाड्यात परतले; पण वडाच्या झाडावर माकडासारखी चढणारी आणि उतरणारी पोरं त्यांना नजरेसमोर दिसत होती. घडलेला प्रसंग त्यांनी महाराणीसाहेबांना सांगितला. त्यांनीही तो खेळ पाहण्याची इच्छा व्यक्त केली. सयाजीरावांनी विद्याधिकारी श्री. काटावालांना बोलावलं. नजरपागेतली ती पोरं शोधून आणायचा हुकूम केला. नारायणराव घाटगे यांनी त्या पोरांची नावं व राहण्याचं ठिकाण सांगितलं.

विद्याधिकाऱ्यांचा शिपाई त्या भागात पोहोचला. त्यानं पोरांचा शोध घेतला. गजानन आणि काळूला साहेबांकडे घेऊन आला. "झाडावर चढण्याचा तुमचा खेळ बघून महाराज खूश झाले. हा खेळ महाराणीसाहेबांनाही पाहायचाय. उद्या तिसऱ्या प्रहरी तुम्ही दोघे राजवाड्यात या !" विद्याधिकारी म्हणाले.

वजाबाकी करा.

## ४. वजाबाकी

टेस्ट सोडवा

### हातच्याची वजाबाकी

(१) ९०७२ – ७५४८ ही वजाबाकी करू.

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| ८ | १० | ६ | १२ |
| ~~९~~ | ~~०~~ | ~~७~~ | ~~२~~ |
| – ७ | ५ | ४ | ८ |
| १ | ५ | २ | ४ |

प्रथम संख्या उभ्या मांडणीत लिहिल्या. २ एककांमधून ८ एकक वजा होत नाहीत, म्हणून ७ दशकांतील १ दशक सुटा केला. दशकांच्या घरात ६ दशक राहिले. १ दशकाचे १० एकक व आधीचे २ एकक मिळून १२ एकक झाले. १२–८ = ४ एकक उरले.
६ द – ४ द = २ द. दशकांच्या घरात २ उरले.

आता ० शतकातून ५ शतक वजा होत नाहीत, म्हणून ९ हजारांतून १ हजार मोकळे केले. हजारांच्या घरात ८ राहिले. १ हजाराचे १० शतक होतात. आधीचे ० शतक आणि मोकळे केलेले १० मिळून १० शतक झाले. १० श – ५ श = ५ श.
८ ह – ७ ह = १ ह. वजाबाकी १५२४ आली.

(२) वजाबाकी करा : ५००० – ९६७

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| | ९ | ९ | |
| ४ | ~~१०~~ | ~~१०~~ | १० |
| ~~५~~ | ~~०~~ | ~~०~~ | ~~०~~ |
| – | ९ | ६ | ७ |
| ४ | ० | ३ | ३ |

येथे ० एककातून ७ एकक वजा होत नाहीत, म्हणून दशक मोकळा करायला हवा; पण दशकस्थानी आणि शतकस्थानीही काही नाही; म्हणून ५ हजारांतील १ हजार मोकळा करून १० शतक मिळवू. १० शतकांपैकी १ शतक मोकळा करून १० दशक मिळवू. शतकांच्या घरात ९ शतक राहतील. या १० दशकांपैकी १ दशक मोकळा करू, म्हणजे १० एकक मिळतील आणि दशकांच्या घरात ९ दशक राहतील. मिळालेले एकक एककांच्या घरात लिहू. १० ए–७ ए = ३ ए; ९ द – ६ द = ३ द; ९ श – ९ श = ० श; ४ हजारांतून काहीच वजा करायचे नाही, म्हणून वजाबाकी आली ४०३३.

### स्वाध्याय

१. वजाबाकी करा.

(१)

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| ४ | २ | १ | ५ |
| – २ | ६ | ४ | ९ |
| | | | |

(२)

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| ७ | १ | २ | ३ |
| – ५ | ७ | ८ | ४ |
| | | | |

(३)

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| ३ | ० | १ | ४ |
| – २ | ५ | २ | ७ |
| | | | |

(४)

| ह | श | द | ए |
|---|---|---|---|
| | | | |
| ६ | ३ | २ | ५ |
| – | ७ | ५ | ८ |
| | | | |

## 4. Subtraction

टेस्ट सोडवा

- subtract.

### Subtraction by borrowing

**(1) Let us solve : 9072 – 7548.**

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| 8 | 10 | 6 | 12 |
| ~~9~~ | ~~0~~ | ~~7~~ | ~~2~~ |
| – 7 | 5 | 4 | 8 |
| 1 | 5 | 2 | 4 |

First we write the numbers vertically. We cannot subtract 8 units from 2 units. Therefore, we untie 1 ten from 7 tens. 6 tens remain in the tens place. 10 units from 1 ten plus 2 units make 12 units. 12 – 8 = 4 units.

6T – 4T = 2T. 2 tens remain in the tens place.

We cannot subtract 5 hundreds from 0 hundreds. Therefore, we untie 1 thousand from 9 thousands. 8 remain in the thousands place. 1 thousand equals 10 hundreds. 10 hundreds plus 0 hundreds make 10 hundreds.

10H – 5H = 5H.

8Th – 7Th = 1Th. The answer is 1524.

**(2) Solve : 5000 – 967**

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| | 9 | 9 | |
| 4 | ~~10~~ | ~~10~~ | 10 |
| ~~5~~ | ~~0~~ | ~~0~~ | ~~0~~ |
| – | 9 | 6 | 7 |
| 4 | 0 | 3 | 3 |

Here, we cannot subtract 7 units from 0 units. We must untie 1 ten. However, there are no numbers in the tens and hundreds places. Therefore, we will untie 1 thousand from the 5 thousands and obtain 10 hundreds. Then we untie 1 hundred from 10 and we obtain 10 tens. There are 9 hundreds left in the hundreds place. Of the 10 tens, we untie 1 ten. We get 10 units and 9 tens will remain in the tens place. We write the units in the units column. 10 U – 7 U = 3 U; 9 T – 6 T = 3 T; 9 H – 9 H = 0 H; there is nothing to subtract from 4 thousands. The answer is 4033.

### Exercise

1. Subtract.

(1)

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| | | | |
| 4 | 2 | 1 | 5 |
| – 2 | 6 | 4 | 9 |
| | | | |

(2)

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| | | | |
| 7 | 1 | 2 | 3 |
| – 5 | 7 | 8 | 4 |
| | | | |

(3)

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| | | | |
| 3 | 0 | 1 | 4 |
| – 2 | 5 | 2 | 7 |
| | | | |

(4)

| Th | H | T | U |
|---|---|---|---|
| | | | |
| 6 | 3 | 2 | 5 |
| – | 7 | 5 | 8 |
| | | | |

टेस्ट सोडवा

## Listen and understand. Revision

2. Read the following words aloud and copy them in your notebook.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| a | I | he | you | all |
| this | up | on | of | to |

3. Read aloud the following phrases.

* a few
* quite a few
* long leaps
* on and on
* all this while
* slow but steady

- Find these phrases on pages 17 to 19.

## Categories

Find words to complete the following chart and write them in the proper place.
खालील तक्ता पूर्ण करण्यासाठी योग्य शब्द शोधा आणि तक्त्यात लिहा.

| Categories / First Letter | Something we Eat or Drink | An Animal | A Thing | An Action |
|---|---|---|---|---|
| a | | | | |
| b | | | | |
| c | | | | |
| p | | | | |
| t | | | | |
| m | | | | |
| w | watermelon | wolf | watch | wipe |

Project

**Categories**

Make a categories chart and try to fill all the columns for all the letters from 'a' to 'z'. List the categories and letters for which you do not find any words. Try to find the words with help of your friends and earlier textbooks.

वरीलप्रमाणे 'categories' तक्ता तयार करून 'a' ते 'z' सर्व अक्षरांसाठी शब्द शोधा. ज्या 'categories' आणि अक्षरांसाठी शब्द सापडत नाहीत, त्यांची यादी तयार करा. मित्रमैत्रिणींशी बोलून किंवा पहिली ते तिसरीच्या पाठ्यपुस्तकांत ते शब्द मिळतात का पहा.





पाठ वाचा व समजून घ्या.

# ५. घरोघरी पाणी

टेस्ट सोडवा



## पिण्याच्या पाण्याची काळजी



आरोग्यासाठी पिण्याचे पाणी निर्धोक असणे गरजेचे असते. पोटात दूषित पाणी गेले तर रोग होऊ शकतात. म्हणून पिण्याचे व स्वयंपाकाचे पाणी साठवताना आपण विशेष काळजी घेतो.

पिण्याच्या व स्वयंपाकाच्या पाण्याची भांडी आपण झाकून ठेवतो. त्यामुळे पाण्यात धूळ व कचरा पडत नाही. हात बुडवून पाणी काढले, तर बोटांना लागलेली घाण पाण्यात जाते. म्हणून आपण पाणी काढण्यासाठी लांब दांड्याचे ओगराळे वापरतो. पाणी काढून लगेच झाकण ठेवतो.

पण या भांड्यांना तोट्या लावणे ही पाणी काढण्याची सर्वांत उत्तम पद्धत आहे. त्यामुळे पाणी खराब होण्याचा प्रश्नच उरत नाही आणि पाणी काढणेही अधिक सोईचे होते.

एखाद्या भांड्यातील पाणी संपले, की त्यात पुन्हा पाणी भरण्याआधी ते भांडे आपण धुऊन घेतो. अशी काळजी घेतली तर आपल्याला सतत स्वच्छ पाणी मिळत राहते.

### माहीत आहे का तुम्हांला

**पाणी शिळे होत नाही...**


आधीच्या दिवशी घरात भरून ठेवलेले पिण्याचे पाणी काही जण ओतून देतात आणि दुसरे पाणी भरतात. त्यांना वाटते, पाणी शिळे होते. पण ही समजूत चुकीची आहे. पाणी ओतून देणे म्हणजे चांगले पाणी वाया घालवणे. पाणी खराब झाले असले तरच त्याचा वापर पिण्याव्यतिरिक्त इतर कामासाठी करावा.

### जरा डोके चालवा

पाणी भरून ठेवण्यासाठी स्टील व प्लॅस्टिकची भांडी लोक का पसंत करू लागले असतील ?

### करून पहा

**हा प्रयोग मोठ्यांच्या मदतीने करा.**



- एक प्लॅस्टिकची बाटली घ्या. तिचा वरचा निमुळता भाग कापून टाका. बाटलीच्या चार बाजूंना, तळापासून थोड्या वर चार भोके पाडा.
- एक रिकामी रीफिल घेऊन तिचे चार छोटे तुकडे कापून घ्या. हे

# ५. शिवरायांचे शिक्षण

टेस्ट सोडवा

## वाचा व समजून घ्या.

सराव

लहानपणापासूनच मिळाले होते. जाधव व भोसले या दोन्ही प्रसिद्ध घराण्यांची लढाऊ परंपरा त्यांच्या ठिकाणी एकत्र आली होती. जिजाबाई मोठ्या स्वाभिमानी व स्वातंत्र्यप्रिय होत्या. मराठा सरदाराने कितीही पराक्रम केला, तरी सुलतानांच्या दरबारात त्याचे चीज होत नाही, याचा त्यांना वाईट अनुभव आला होता. निजामशाहाने भर दरबारात त्यांच्या पित्याची हत्या केली होती. त्याचे दु:ख त्यांनी पचवले होते. जिजाबाईंनी आता निश्चय केला होता, की त्यांचा शिवबा अशी परक्यांची चाकरी करणार नाही. तो स्वत:च आपल्या लोकांचे राज्य म्हणजे स्वराज्य स्थापन करील. या विचाराने त्या शिवरायांना घडवत होत्या.

मावळात राहणाऱ्या लोकांना मावळे म्हणत. मावळे इमानी, कष्टाळू व चपळ होते. काटकपणात त्यांचा हात कोणी धरत नसे, पण ते सुलतानी राजवटीने गांजले होते. सुलतानांच्या लष्कराकडून गावेच्या गावे लुटली जात. रयत परागंदा होई. तिला कोणी वाली नसे. अशा दु:खी-कष्टी लोकांसाठी आपण काहीतरी करावे, असे शिवरायांना वाटे.

घरी आल्यावर शिवराय जिजाबाईंपाशी हितगुज करत. जिजाबाई म्हणत, ''शिवबा, भोसल्यांचा पूर्वज श्रीरामचंद्र. श्रीरामचंद्राने दुष्ट रावणाला मारले आणि प्रजेला सुखी केले. जाधवांचा पूर्वज श्रीकृष्ण. त्याने दुष्ट कंसाला ठार केले आणि प्रजेला सुखी केले. श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या वंशात तुझा जन्म झाला आहे. अरे, तूसुद्धा दुष्टांचा संहार करू शकशील. तूसुद्धा गरीब लोकांना खूप सुखी करू शकशील.''



वीरमाता जिजाबाई

आईच्या या उपदेशाने शिवरायांना हुरूप येई. राम, कृष्ण, भीम, अर्जुन या वीरांच्या गोष्टी त्यांना आठवत. हे वीरपुरुष शिवरायांना सतत ध्यानी, मनी, स्वप्नी दिसत. हे वीर अन्यायाविरुद्ध जसे लढले, तसे आपण लढावे. त्यांनी दुष्टांचा नाश केला, तसा आपण करावा. त्यांनी प्रजेला सुखी केले, तसे आपण करावे. आपण न्यायी व्हावे, धाडसी व्हावे, पराक्रमी व्हावे, असे शिवरायांना सतत वाटू लागले.

**शिवरायांचा नवा अंमल :** पुणे जहागिरीत आता जिजाबाईंच्या मार्गदर्शनाखाली शिवरायांचा नवा अंमल सुरू झाला. या कामासाठी

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे    वेब स्त्रोत-'ई-बालभारती'    सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in